निशाणी क्र. ५९

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०४ यांची साक्ष.**

**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

**नाव** - कडू दशरथ कुकलारे

**वय** - २८ वर्ष, **पद** - वनरक्षक

**नेमणूक** - वन परिक्षेत्र, खुबाळा बिट, खापा, तह. सावनेर, जि. नागपूर.

**सरतपास सरकारतर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती. एच.ए. डेकाटे यांच्यामार्फत.**

मी दि. ०३.०४.२०२४ रोजी पासून वनरक्षक या पदावर वन परिक्षेत्र, खापा येथे कार्यरत आहे. दि. १४.०३.२०२५ रोजी भागदळा नाला, सिरोंजी येथे रोडपासून १०० ते १५० मिटर आत नाल्यात वाघाची शिकार झाली होती. मी, गिरी मॅडम, डाखोरे, दोन वन मजदूर असे आम्ही उत्तर दिशेला चौकशीसाठी गेलो. घटनास्थळापासून २०० ते ३०० मिटरच्या अंतरावर शेकोटी पेटवलेली दिसली. तिथे नाल्यात ८ खुंटया लावलेल्या दिसल्या. मोक्का पंचनामा डाखोरे यांनी केला व त्यावर मी व गिरी मॅडम यांनी सही केली. मला मोक्का पंचनामा दाखवण्यात आला. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ६०** देण्यात येते.

**२.** लाकडी खुंटया माझ्यासमक्ष जप्त केल्या होत्या. त्या मला दाखवण्यात आल्या. त्या त्याच आहेत. त्या एम.ओ. क्र. २ कडे आहे.

**३.** दि. १९.०३.२०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता मेमोरेंडम पंचनामा सुरू केला. आरोपी पंढरी, किशोर, छेदीराम व नंदू असे चार आरोपी वन कोठडीमध्ये होते.

**४.** पंढरी याने सांगितले की, २०० ते ३०० मिटर आधी बडेगाव ते सोनपूर रोडवर एक शेती होती, तिथे त्याने करंट लावला होता. पंढरीला गाडीमधून तेथे नेले. त्याला त्या शेतामध्ये नेले. तिथे रक्त लागलेली गोणी होती. तिथे त्याने लाकडी खुंटया व बांबू दाखवला. त्यानंतर त्याला सिरोंजी येथील घटनास्थळी नेले. परंतु तिथे त्याने काही

सांगितले नाही. त्याला सोनपूर येथे त्याच्या गावी नेले. पंढरीने त्याचे घर दाखवले व घरात गेलो असता त्याने एक कोयता व एक कु-हाड दाखवली. मला बांबू, कोयता (सुरी) व कु-हाड दाखवण्यात आली. त्या वस्तू त्याच आहेत. बांबू हा एम.ओ. क्र. ९ कडे आहे. कोयता (सुरी) व कु-हाड एम.ओ. क्र. ५ व ६ वर आहे. तसा मेमोरेंडम व जप्ती पंचनामा क्षेत्र सहाय्यक गडलिंगे यांनी केला. तो मला दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. मजकूर खरा व बरोबर आहे. तो नि.क्र. २४ वर आहे. मी आरोपी पंढरीला ओळखतो. तो आज विडीओ कॉन्फरंसद्वारा न्यायालयात हजर आहे. वन कोठडीमध्ये असतांना मी इतर आरोपींना पाहिले होते. ते देखील आज विडीओ कॉन्फरंसद्वारा न्यायालयात हजर आहेत.

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्रीमती. जे. एच. शेंडे यांचेमार्फत**

**५.** दि. १४.०३.२०२५ रोजी मी डयुटीवर हजर असल्याबाबत मी दोषारोपपत्रामध्ये कोणतेही कागदपत्र दाखल केले नाही. माझी फक्त सही आहे. मी कार्यालयात आलोच नाही मी माझ्या वनक्षेत्रात असल्यामुळे मी घटनास्थळी जाण्याआधी ऐंट्री केली नाही. मी वनपरिक्षेत्र अधिकारी, खापा सचिन आठवले यांच्या आदेशा प्रमाणे कार्यवाही केली आहे. एन.टी.सी.ए. म्हणजे काय हे मला माहित नाही. नि.क्र. ६० वरील घटनास्थळाच्या पूर्वेला खाजगी शेती आहे, पश्चिमेला खाजगी शेती आहे, उत्तरेला नाला आहे व दक्षिणेला देखील नाला आहे. खाजगी शेतींचा शेत क्रमांक मला आता लक्षात नाही. जी.पी.एस. रिडींग मला आठवत नाही. बाजन घाटे यांची शेती घटनास्थळाच्या पुर्वेला होती. ८ खुंटया कोणत्या दिशेला मिळून आल्या हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मोक्का पंचनाम्यावर कार्यालयात सही केली. पंचांची नाव गजू कोल्हे व श्रीपद टेकाम होती. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचनाम्यांवर कार्यालयात सही केली. हे म्हणणे खरे नाही की, मी ८ खुंटया घटनास्थळी पाहिल्या नाही व कार्यालयात पाहिल्या आहेत.

**६.** दि. १९.०३.२०२५ रोजी मी कार्यालयात हजर असल्याबाबत दोषारापपत्रामध्ये कागदपत्र दाखल केल्याबाबत मला माहित नाही. मी पंढरीचा जबाब

नोंदवला आहे. कार्यालयामध्ये नि.क्र.२४ वरील एक पेज व मागचे अर्धे पेज नोंदवले होते. हे म्हणणे खरे आहे की, कार्यालयामध्ये त्यावर सही केली नव्हती. मी कार्यालयामधून सकाळी अंदाजे १०.०० ते ११.०० वाजताच्या दरम्यान शासकीय वाहनाने निघालो. चार शासकीय गाडया होत्या. मला गाडयांने नंबर आठवत नाही. नि.क्र. २४ वरील घटनास्थळाच्या चतु:सिमा मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्याचे जी.पी.एस. रिडींग सांगू शकत नाही. जप्त कु-हाडचा दांडा अंदाजे ५० से.मी. होता, निश्चित लांबी मी सांगू शकत नाही. कु-हाडीच्या पात्याची लांबी मी सांगू शकत नाही. कोयत्याच्या पात्याची लांबी अंदाजे १५ ते २० से.मी. होती. जप्ती केली तेथील चतु:सिमा मला आठवत नाही. साक्षीदार पुन्हा सांगतो की, एका दिशेला शेती व बाकी तीन दिशेला घरे होती. ती शेती कोणाची होती हे मला माहित नाही. घर कोणाची होती हे मी सांगू शकत नाही. त्याचे जी.पी.एस. रिडींग मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, जप्ती करून कार्यालयामध्ये जावून पंचनाम्यावर सही केली. मी पंचनाम्यावर अंदाजे ५.०५ ते ५.१० वाजता सही केली. शेवटच्या पंचनाम्यावर किती वाजता सही केली हे मला निश्चित आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र. ६० व २४ वरील पंचनामे मी न वाचता कार्यालयात सहया केल्या. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत
समक्ष

SONPARI MAHENDRA GADE
Digitally signed by SONPARI MAHENDRA GADE
Date: 2026.02.03 17:34:18 +0530

सावनेर,
दिनांक ०३.०२.२०२६

(एस. एम. गाडे)
**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**
(न्यायालय क्र.०३) सावनेर

# C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF evidence are same word to word, as per the original evidence.

Name of Stenographer :- D. R. Aglawe